महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**परिपत्रक :-**

जा. क्र. : तंशिविकापु/विवि-३/मान्यता/२०२३/ १३४८

दिनांक : २४/०३/२०२३

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था (पुणे विभाग)

**विषय : अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद,नवी दिल्ली यांचे जाहिर सुचेनेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून नविन तांत्रिक संस्था सुरु करण्यासाठी “National Single Window System (NSWS)” (https:/www.nsws.gov.in) या पोर्टल वर ऑन लाईन अर्ज केलेल्या तथा करण्यात येणाऱ्या अर्जाबाबत**

**संदर्भ** :- १. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी त्यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली जाहिरात क्रमांक RegulationBureau/AICTE/03(02)/२०२३ दि.२१.०३.२०२३

२. संचालनालयाचे पत्र क्र.०२/एनजीपी/अआयसीटीई-मान्यता/२०२३-२४/२६८ दि.२४.०३.२०२३

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) यांनी संदर्भीय जाहिर सुचनेव्दारे अॅप्रुव्हल प्रोसेस हँडबुक २०२३-२४, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (टेक्निकल इन्स्टिटयुशनकरिता मान्यतेला मंजूरी) विनियम २०२० आणि पहिली दुरुस्ती विनियम, २०२१ यामधील तरतूदीनुसार शै.व.२०२३-२४ पासून नविन तांत्रिक संस्था सुरु करण्यासाठी **“National Single Window System (NSWS)” (https:/www.nsws.gov.in)** या पोर्टलवर दि.२३.०३.२०२३ पासून दि. ०६.०४.२०२३ पर्यंत, तसेच विलंब शुल्कासह ऑन लाईन अर्ज सादर करण्याचा शेवटचा दि.१३.०४.२०२३ हा निर्धारीत केलेला आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता या विभागातील अभियांत्रिकी, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी, व्यवस्थापनशास्त्र (एमबीए,पीजीडीबीएम), एमसीए, डिझाईन, प्लॅनिंग या अभ्यासक्रमांच्या पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी व पदविकोत्तर पदविका स्तरावरील संस्था सुरु करण्यासाठी वरील पोर्टलवर सादर केलेल्या संस्थांच्या अर्जावर शासनाचे अभिप्राय परिषदेस सादर करावयाचे असतात. संबंधित संस्थानी प्रस्ताव सादर केल्यानंतर प्रत्यक्ष तपासणीसह सर्व औपचारीक कार्यवाही होऊन प्रत्यक्ष शासनाचे अभिप्राय परिषदेस सादर करण्यासाठी पुरेसा अवधी अपेक्षीत आहे.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या संदर्भीन जाहिर सुचनेस अनुसरुन या विभागातील अभियांत्रिकी, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी, व्यवस्थापनशास्त्र (एमबीए,पीजीडीबीएम), एमसीए, डिझाईन, प्लॅनिंग या अभ्यासक्रमांच्या पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी व पदविकोत्तर पदविका स्तरावरील संस्था सुरु करण्यासाठी **“National Single Window System (NSWS)”** (https:/www.nsws.gov.in) या पोर्टलवर सादर केलेल्या व अर्ज करणार असणाऱ्या संस्थांच्या अर्जाबाबत शासनाने अभिप्राय देण्याकरीता प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे. संबंधित संस्थांनी दि.२२.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेले नोंदणी शुल्क डीडी व्दारे सहसंचालक,तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे (Joint Director, Technical Education,Regional Office pune )या नावे या कार्यालयाकडे जमा करावे. तसेच **दि.०३.०४.२०२३ पर्यंत नवीन संस्था सुरु करण्यासाठीचा प्रस्ताव या कार्यालयाकडे जमा करावा.** या प्रस्तावासोबत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या संकेतस्थळावरील https://www.aicte-india.org/sites/dedault/files/approval/2023-24/Appendix-16.pdf या लिंक वर नमूद केलेले सर्व कागदपत्रे जोडणे अनिवार्य आहे.

कृ. मा. प.

संबंधित संस्थांनी दि.०३.०४.२०२३ पर्यंत या कार्यालयास अर्ज सादर न केल्यास व परिणामी शासनाचे अभिप्राय, शासन मान्यता इ.बाबत आगामी काळात काही अडचणी निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थांची राहील याची नोंद घेण्यात यावी.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता